कार्यवाह
शांताराम पंदेरे
चव्हाण निवास
खोकडपुरा
औरंगाबाद ४३१ ००१

सहकार्यवाह
मधु मोहिते
पोतदार बिल्डिंग
शास्त्रीनगर कळवा,
जि. ठाणे ४०० ६०५

मध्यवर्ती कार्यालय
द्वारा : अजित सरदार
राही चेंबर्स,
२० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
फोन : 329626

# युवक क्रांती दल, महाराष्ट्र

युक्रांद

जावक क्र.

दिनांक २५.८.९३

## विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना

## आवाहन

काँग्रेस ( आय ) च्या केंद्र व राज्य सरकारांनी अंगिकारलेली नविन आर्थिक धोरणे, मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावाखाली जगातील बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या देशाची लूट करण्यास खुले केलेले दरवाजे, आता डंकेल प्रस्ताव जो नवसाम्राज्यवादाचे व आपल्या देशावर येवू घातलेल्या नव्या गुलामगिरीचे प्रतिक बनला आहे, तो स्वीकारावा म्हणून आपल्या सरकारवर येत असलेले जागतिक दडपण इ. च्या परिणामी आपला समाज एका गंभीर संकटाच्या दिशेने भरधाव वाटचाल करीत आहे. एकाबाजूला ही परिस्थिती असताना दुसरीकडे देशातील राजकारणात धर्मांचा संकुचित स्वार्थासाठी वापर केला जात आहे. त्यामुळे विविध धार्मिक समूहांमध्ये तणाव वाढत आहेत. गेल्या ६ डिसेंबर नंतर झालेल्या धार्मिक दंगली त्यात झालेला जिवित व वित्तहानी यामुळेही भविष्याबद्दल चिंता वाटावी अशी स्थिती निर्माण झाली आहे. समाजाच्या विकासाच्या नावाखाली समाजातील उपेक्षित जातीजमती व अन्य समूहांच्या हिताचा विचार न करता मूठभरांच्या गुणवत्तेच्या व संपन्नतेच्या वाढीचा विचार डोळ्यासमोर ठेवून वाटचाल चालू आहे. हे सर्वच भयावह आणि समाज्याच्या व्यापक हिताच्या विरोधी असल्याने सर्वच घटकांनी त्याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आता आली आहे. याविषयी कोणात फारसे मतभेद होणार नाहीत

नविन आर्थिक धोरणावर आपण पूर्वी डॉ. एच. के परांजपे यांची भाषणे ठेवली होती त्यानंतर बरीच वाटचाल झाली आहे. आता वर नमूद केलेल्या सर्वच बाबींविषयी विचार करून त्यासंदर्भात आपण आपल्या पातळीवर काय करू शकू याचा विचार करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील याप्रश्नाविषयी आस्था असणाऱ्या काही प्राध्यापक आणि विद्यार्थी-विद्यार्थीनींची बैठक आयोजित करीत आहोत. आपण स्वतः तर उपस्थित रहावेच परंतु आपल्या शिष्यपरिवार व अन्य परिचितांनाही आवर्जून येण्यास सांगावे ही विनंती.

कार्यक्रमाचा विषय

नवी आर्थिक गुलामी व देशातील वर्तमान स्थिती

स्थळ : राही चेंबर्स , २० सदाशिव पेठ, पुना हॉस्पिटल समोर
पुणे ३०

वेळ : मंगळवार दिनांक ३१ रोजी दुपारी ४ वाजता .

आपला विनित
अजितसरदार
( अजित सरदार )